# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय सोलापूर
## (दुय्यम चिटणीस शाखा)

☎ ०२१७ - २७३१०२०

email : dcbsolapur@gmail.com


क्र.२०१८/डिसीबी/२/आरआर/८३६४ दिनांक : १७/११/२०१८

---

वाचले :- १) उपविभागीय दंडाधिकारी, पंढरपूर विभाग पंढरपूर यांचेकडील पत्र क्र. जबाबी/कावि/ २४९८/१८ दि. १७.११.२०१८

२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील कलम १४४

---

## आदेश

ज्याअर्थी उपविभागीय दंडाधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये माझ्या असे निदर्शनास आणून दिलेले आहे की, पंढरपूर शहरामध्ये दिनांक ११.११.२०१८ ते दि. २३.११.२०१८ या कालावधीत कार्तिकीवारी मोठया प्रमाणात भरत असून सदर वारी कालावधीमध्ये लाखो भाविक पंढरपूर शहरामध्ये येत असतात. वारी कालावधीमध्ये दिनांक १८.११.२०१८ ते दि. २०.११.२०१८ पर्यंत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल याबाबत बंदी आदेश जारी करणेबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी, पंढरपूर शहरामध्ये दिनांक १८.११.२०१८ ते दि. २०.११.२०१८ या कालावधीमध्ये मांस, मटण,मासे विक्री व प्राणी कत्तल यावर बंदी आदेश जारी न केल्यास सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची दाट शक्यता असून पंढरपूर शहरास सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी दिनांक १८.११.२०१८ ते २०.११.२०१८ या कालावधीमध्ये मांस, मटण,मासे विक्री व प्राणी कत्तल यावर बंदी आदेश जारी करणेबाबत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ चे आदेश लागू करणे निकडीचे व जरूरीचे असल्याचे माझे निदर्शनास आले आहे.

त्याअर्थी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी जिल्हादंडाधिकारी सोलापूर, असा आदेश देतो की, दिनांक १८.११.२०१८ ते २०.११.२०१८ या कालावधीत पंढरपूर शहरामध्ये मांस, मटण,मासे विक्री व प्राणी कत्तल यावर बंदी घालत आहे. सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १७/११/२०१८ रोजी दिला आहे.

DISTRICT MAGISTRATE जिल्हा दंडाधिकारी सोलापूर SOLAPUR

(डॉ.राजेंद्र ब. भोसले भा.प्र.से.)
जिल्हादंडाधिकारी सोलापूर

प्रत :- १) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेकडे प्रसिद्धीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२) उपविभागीय दंडाधिकारी, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

३) व्यवस्थापक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, मुद्रणालय, पुणे यांचेकडे राजपत्रात प्रसिद्ध करणेसाठी सस्नेह अग्रेषित.

४) जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांना सर्व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्धी करणेकामी.

५) तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, पंढरपूर यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

६) मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

७) राष्ट्रीय सूचना -विज्ञान केंद्र (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

२/- सदरचा आदेश दि. १८.११.२०१८ ते दि. २०.११.२०१८ या कालावधीत वेबसाईटवर प्रसिद्ध करावे.

G:\Ransubhe Office Folder\CPK - 17\soldier complaint